
ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# मा. यशवंतराव चव्हाण यांचे कृषि-औद्योगिक क्षेत्रातील योगदान

**डॉ. माने ए.एस**
इतिहास विभाग प्रमुख, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि. सोलापूर.

*प्रास्ताविक:*



*विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आधुनिक नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अग्रगण्य असे आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाबरोबरच केंद्र सरकारमध्ये संरक्षण, अर्थ, परराष्ट्र, व्यापार, व गृहमंत्री पदावरून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करताना जगातील मुत्सही, राजकोय प्रज्ञावंत, अर्थशास्त्रज्ञ) राजकीय सत्ताधारी इत्यादींमध्ये त्यांचे व्यक्तिमत्व खुलून उठले. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांचा सार्थ गोरव केला जातो. समतोल राजकारणी, कुशल प्रशासक, अफाट लोकसंग्राहक, कलारसिक, तत्वचिंतक, कुटुंबध्वत्सल अशा विविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्व समृध्द होते. यशवंतरावांच्या नेतृत्वाचा प्रभाव महाराष्ट्रावर पड ला याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी आपल्या नेतृत्वाला विशिष्ट हितसंबंधाच्या मर्यादा पडू दिल्या नाहीत त्यांनी विचार केला तो सर्व समाजाचा, सर्व देशाचा, म्हणून सर्व समाजाने त्यांचे नेतृत्व मान्य केले.*

यशवंतराव चव्हाण व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी महाराष्ट्रामध्ये कृषि-औद्योगिक समाजरचनेचा पाया घातला, सहकारी चळवळीला चालना दिली, शेती सुधारणेसाठी प्रयत्न केले, नव्या योजना, नवे प्रकल्प व तंत्राचा वापर केला व ग्रामीण विकासाचा पाया घातला अशा या थोर नेत्याचा जन्म अत्यंत गरीब अशा शेतकरी कुटुंबात १२ मार्च १९१३ रोजी झाला.

## कृषि औद्योगिक समाजरचनेचा पायाः

या देशाच्या शासनाची शक्ती कृषि औद्योगिक समाजाच्या पाठीशी यशवंतराव चव्हाणांनीच सर्वप्रथम उभी केली. औद्योगिकरणाचा सांधा शेतीशी जोडला जावा. ग्रामिण भागात कारखानदारी निघावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यश्वंतरावजींनी औद्योगिकरणची एक सर्वकष योजना आखली. उत्पादनाचा लाभ मालक, कामगार व जनता या सर्वांना व्हावा ब यामध्ये समानता ब एकसूत्रीपणा असावा यावर त्यांनी भर दिला. उद्योगधंद्यांची वाढ केवळ शहरात झाल्याने शहर व खेडी यांतील दरी अधिकच वाढत जाते व तयातून अनेक समस्या उदभवतात. त्या दृष्टीने ग्रामीण जीवणच्या नागरीकरणास त्यांनी चालना दिली. केबळ खेडयांमध्ये ग्रामोद्योग सुरू केले म्हणजे कृष औद्योगिक समाज आपोआप निर्माण हाईल असे मात्र नाही. "समाजातल्या सर्व व्यक्त आणि सुप्त शक्ती उत्पादनासाठी कियान्वित करण्याची संधी आणि सामर्थ्य उपलब्ध करून देणारा संतुलित समाज म्हणजे कृषि औद्योगिक समाज होय.

शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्त आहेत असे ठोकपणे,जाहीरपणे सांगणरे यशवंतराव हे पहिले मुख्यमंत्री शेतीच्या क्षेत्रात पुरोगामी पावले टाकून प्रत्यक्ष निर्णय करण्याचे कार्य महाराष्ट्राने यशवंतरावांच्या कारकीदीतच सर्वप्रथम केले. शेती आणि उद्योगधंदे यासाठी आवश्यक असलेल्या व्यक्तिना शिक्षण देण्यासाठी तांत्रिक ब शेती शाळांची मालिका निर्माण व्हावी, महाराष्ट्रातील प्रत्येक खेडयात वीज उपलब्ध होऊन शेती आणि उद्योगयासाठी विजेचा वापर व्हावा यासाठी नुसत्या घोषणा करून ते थांबले नाहीत. त्यासाठी कोटयावधी हात कामाला लावण्याचा जिवापाड प्रयत्न त्यांनी केला.

### औद्योगिक वसाहतीची स्थापना:

२७ ना'व्हें. १९६१ रोजी यशवंतराव आपल्या विधिमंडळातील भाषणात म्हणतात को, राज्याच्या औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी एका वैधानिक विकास महामंडळाची आवश्यकता आहे. ४ राज्यातथ्ये औद्योगिक वसाहती स्थपन करण्याची एक सर्वकष योलना त्यावेळी मूंबई राज्य सरकारने आखली यशवंतरावांनी उद्योगधंद्यांच्या विकेंद्रीकरणाचा विचार जीवना त कांती घडवून आणणारे कुळाकायदा विधेयक हे त्यांच्याच काकिदीत संमंत झाले आणि त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. शेतीसाठी खते- बी-बियाणे मिळण्यासाठी त्यांनी संशोधन विभाग निर्माण केले.

### सहकाराला चालनाः

महाराष्ट्रातील शेती सुधारणेसाठी सहकारी तत्त्वाची आवश्यकता ओळखून यशवंतरावांनी सहकारी संस्थांचा विकास घडवून आणला. "शेतकरी हा फक्त शेतकरी राहून उनयोगी नाही तर तो व्यापारी व कारखानदार झाला पाहिजे त्याशिवाय त्याचा सर्वागीण विकास होणार नाही, सहकारी चळवळ केवळ सुखवस्तूंच्या मालकाची न झाला पाहिजे. सहकारी क्षेत्र कवस्तृत करण्यासाठी व त्याचा ग्रामीण जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम घडविण्यासाठी सहापकाराला त्यांनी चालना दिली. सहकारातून समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती.

आज महाराष्ट्राप्रमाणे देशभर सहकारी चळवळ फोफावली आहे याचे द्रष्टेपण यशवंतरावांनाच द्यावे लागेल. शेतीसाठी कर्ज पुरवठा करणे, घर बांधणी, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन इ.सीकारी संस्थांना चालना दिली यामुळे सहकारी चळवळ खेडयापासून शहरापर्यंत आली. सहकारी संस्थांना कर्ज पुरठयाची सोय, सहकारी बंका, भूविकास बँका, यांच्यामार्फत करण्यात येवू लागली. ऑगस्ट १९५७ मध्ये यशवंतरावजींच्या सरकारणे राज्यामध्ये १८ सहकारी साखर कारखन्यांची नोंद करून देशामध्ये अग्रेसरत्व प्रस्थापित केले. आज महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात १२०च्या वर सहकारी साखर कारखाने उभे आहेत हे यशवंतरावांच्या द्रष्टेपणाचे द्योतक आहे.

सहकाराचा विचार मांडतांना यशवंतराव सांगतात "सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे तात्विक दृष्टया सहकारी चळवळ ही मुलतः लोकशाहीची चळवळ आहे हे आपण विसरता कामा नये. सामान्य व शोषित समाजाच्या उपयोगी पडणे हा तर या चळवळीचा प्राणच आहे. पण ख-या अर्थाने आपल्याला ही चळवळ चालवावबयाची असेल तर तिच्याकडे आपण लोकशाहीच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. आज आर्थिक प्रगतीचे एक मोठे साधन म्हणून या चळवळीचा स्वीकार केला आहे'. या चळवळीमुळे महाराष्ष्यतील ग्रामीण समाजाचा चेहरा बदलला आहे. सहकारी चळवळोौत आर्थिक सत्ता आहे त्याचप्रमाणे सहकारी चळवळ ही सत्तेची केंद्र आहे त्यामुळे ज्यावर लोकशाहीचा अंकुश ठेवला पाहिजे नाहीतर अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल अशी भीती यशवंतरावांनी व्यक्त केली होती.

यशवंतराव आपले सहकार विषयक विचार पुढील शब्दात व्यक्त करतात, सहकार चळबळ जनतेच्या प्रयत्नावर उभी राहते मात्र सरकार तिचे काळजीपूर्वक संगोपन करीत आहे कारण शेतक-यास पैसे गुंतविण्यास प्रोत्साहित करण्याचा का एकमेव मार्ग आहे. दुसरे म्हणजे ग्रामीण व शहरी लोकातील अंतर कमी होते. सहकारामुळे वाढलेले उत्पन्न जास्त क्षेत्रात वाटले जाते व ख-या अर्थाने समाजवादी समाजरजना तयार होते 'पाटबा-याच्या योजनाः महाराष्ट्रातील शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. शेती पिकविण्यासाठी पाणीपुरबठयाची कायम व्यवस्था करण्याच्या दृष्टीन यशवंतरावांनी पाटबंधार मंडळाची स्थापना केली.

प्रा. धनंजयराव गाडगीळ, स.गो.बर्वे, दत्ता देशमुख अशा जाणकारांचे त्यासाठी सहकार्य मिळवले. या योजनेनुसार खर्चीक साधणे सरकारतफे शेतक-यांना पुरविण्याची व्यवस्था केली गेली. शेतीची यंत्रे चालविण्यासाठी व औद्योगिक विकास

साध्य करण्यासाठी हुकमी विदयुत पुरवठा निर्माण करण्याची गरज होती त्यासाठी जलविदयुत योजना साकार करण्यात यशवंतरावांनी जाणले होते म्हणूनच स.गो.बर्वेसारख्या अर्थतज्ज्ञांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान देऊन प्रगतिशील महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान दिले.

एक मुत्सद्दी राजकोय नेते म्हणून देशविदेशात त्यांन भारताची प्रतिमा निर्माण केली. महाराष्ट्रामध्ये त्यांनी पंचायत राज्याची स्थापना केली. सत्तेच विकेंद्रीकरण करून महाराष्ट्राच्या बांधणीत त्यान सर्व सामान्यांना, युवकांना सहभागी करून कार्यकत्यांच, नेत्यांच जाळ निर्माण केल. गेल्या अर्धशतकात महाराष्ट्राने बेगवेगळया क्षेत्रात जी नेत्रदीपक प्रगती केली त्याचे श्रेय नि:संशयपणे यशवंतरावांच्या दूरदृष्टीला जाते हे नक्की.

संदर्भः


1. चव्हाण यशवंतराव, कृष्णागाठ, खंड पहिला, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, पृ.क्र.१३.
2. भोळे भा.ल., यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला, प्रकाशक पी.डी.पाटील, कराड. १९९ ३, पृ.क्र. १२-१३.
3. डॉ. कायदे पाटील गंगाधर वि, यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, पृ.क्र.९६.
4. यशवंतराव चव्हाण विधीमंडळातील निवडक भाषणे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई. पृ.क्र. १४२.
5. जोशी रामभाऊ, यशवंतराव इतिहासाचे एक पान, केसरी प्रकाशन, पुणे, पृ.क्र.२५७.
6. चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे (भाषण संग्रह), मुंबई, महाराष्ट्र शासन प्रसिध्दी विभाग, १९६२, पृ.क्र. १३६.
7. मनोहर-कशवंतराब चव्हाण स्मृती विशेषांक, संपादक श्री.भा. महाबळ, १९८५, पृ.क्र.२८.
8. महाराष्ट्र सहकार दर्शन स्मृतीग्रंथ, संपादक गणेश. स. शेंदुर्णीकर. पृ.क्र.११.
9. युगांतर, यशवंतराव चव्हाण निवडक भाषणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १४०-१४१.
10. दैनिक नवाकाळ, २५ नोव्हे.१९२५ चा अंक.
11. इतिहासाचे एक पान, उपरोक्त, पृ.क्र.२६६.
12. यशवंतराव चव्हान विधीमंडळातील निवडक भाषणे, उपरोक्त पृ.क्र.१५.
13. इतिहासाचे एक पान, उपरोक्त, पृ.क्र. २६७.
14. पाटील रा.तु. यशवंतराव चव्हाण: एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी, राजे-देसाई प्रकाशन, कोल्हापुर, पृ.क्र. ४९-५०.